आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र. ३२

### एकशिक्षकी शाळेत इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी सहयोगी अध्ययन पद्धतीचा परिणामकारक वापर करण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका

The Role of School Leadership in the Effective Use of Collaborative Learning Approaches for Class I to V Students in a One-Teacher School.



**प्रस्तावना:**

आज आपण २१ व्या शतकात म्हणजेच माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश केलेला आहे. २० व्या शतकातून २१ व्या शतकात प्रवेश करीत असताना आपल्यासमोर खूप आव्हाने उभी आहेत. या आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम बनविण्याची ताकद फक्त शिक्षणात आहे. शिक्षण ही आनंददायी प्रक्रिया असायला हवी.

आजच्या काळात शिक्षण ही अतिशय महत्वपूर्ण बाब आहे. माहिती तंत्रज्ञानाची नवनवीन क्षितिजे उदयास येत आहेत. यासाठी काळानुरूप ज्ञाननिर्मिती ही बाब अपरिहार्य

आहे. यासाठी स्वत:च्या अनुभवाच्या आधारे ज्ञानाची रचना करण्यासाठी ज्ञानरचनावादाचा समावेश अध्ययन अध्यापनात झाला. या ज्ञानाची रचना करीत असताना आपला दृष्टीकोन तर महत्वाचा असतोच पण इतर विद्यार्थ्यांशी चर्चा करून, विचारांची देवाण घेवाण करून जर ते ज्ञान मिळाले तर ते निर्दोष असते. यासाठी सहयोगी अध्यापन पद्धतीसारख्या अध्यापन पद्धतींचा वापर होणे आवश्यक आहे.

या ज्ञाननिर्मितीसाठी शिक्षण प्रक्रियेत अध्ययन अध्यापन परिणामकारक होण्यासाठी अनेक पूरक गोष्टींचा वापर केला जातो. उदा. अध्ययनासाठी तंत्रज्ञानाचा वापर, विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार अध्ययन अध्यापन पद्धत, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा वापर इ.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार बदलत्या काळानुरूप २१ व्या शतकाला अनुसरून विद्यार्थ्यांमध्ये २१ व्या शतकातील कौशल्यांचा विकास साधला गेला पाहिजे. यातील अध्ययनाशी निगडीत महत्वाची जी चार कौशल्ये आहेत ती म्हणजे चिकित्सक विचार, सहकार्य, संभाषण, सर्जनशीलता. ही कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित होण्यासाठी तशा स्वरूपाच्या विविध अध्ययन अध्यापनाच्या पद्धतीचा वापर करणे गरजेचे आहे.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे:**

१) शिक्षणामध्ये सहयोगी अध्यापन पद्धतीचे महत्व समजून घेणे.
२) सहयोगी अध्यापन पद्धतीच्या वापराबाबत शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
३) सहयोगी अध्यापन पद्धतीचा वापराबाबत शालेय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास करणे.
४) अध्ययन-अध्यापनात सहयोगी अध्ययन पद्धतीचा उपयोग करण्याबाबत शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

**मोड्यूल विकसनाची गरज:**

आजचे शैक्षणिक वातावरण सतत बदलते आणि गतिमान आहे. मुख्याध्यापकांना शिक्षकांसोबतच विद्यार्थी, पालक, विविध शासकीय कार्यालये ,समाजातल्या वेगवेगळया व्यक्ती अशा अनेक घटकांना एकावेळी सामोरे जावे लागते. आणि यासोबतच शाळेबद्दल सकारात्मक वातावरण कायम राखण्याचे आव्हानही पेलावं लागतं. याशिवाय शैक्षणिक बाबी, प्रशासकीय बाबी, तसेच शालेय उपक्रम इत्यदी अनेक आघाड्यांवर मुख्याध्यापकांना काम करताना आपल्या शाळेची ध्येयधोरण, नियम, शिस्त यांचे पालन करणे इतर शाळांच्या तुलनेत आपल्या शाळेची गुणवत्ता जोपासना करणे ही कामे मुख्यत्वे करावी लागतात. त्यामुळे मुख्याध्यापकांचे

व्यक्तिमत्व हे बहुआयामी, अष्टपैलू  असणे आणि त्यांच्यामध्ये विविध कौशल्य, प्रेरणा, दृष्टिकोन असणे गरजेचे आहे. परंतू गेल्या दहा वर्षात शिक्षकांची भरती झालेली नाही.  जे शिक्षक सेवानिवृत्त झाले त्यांच्या जागा अद्याप रिक्त आहेत. त्यामुळे अध्यापनाची जबाबदारी ही उपलब्ध शिक्षकांवरच आहे. महाराष्ट्रात शिक्षकांची संख्या ही वर्गानुसार न ठरविता विद्यार्थी संख्येनुसार ठरते.

शाळा भेटी दरम्यान असे निदर्शनास आले की, ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षक एकापेक्षा जास्त इयत्तांना अध्यापनाचे कार्य करताना दिसून येतात. शाळेची एकूण पटसंख्या जरी कमी असेल तरी प्रत्येक इयत्तेच्या अध्ययन निष्पत्ती, दिले जाणारे अध्ययन अनुभव, विविध अध्ययन  स्तरातील विद्यार्थी त्यांच्यासाठी आखावे लागणारे कृती कार्यक्रम व त्याची अंमलबजावणी तसेच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन त्याचबरोबर मुख्याध्यापक म्हणून येणारी प्रशासकीय जबाबदारी, हे सर्व करत असताना शिक्षकांची तारांबळ होताना दिसून येते. आणि हे सर्व करीत असताना विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकासही तितकाच महत्वाचा आहे.

शाळा भेटीदरम्यान अशा काही शाळांना भेटी देण्यात आल्या जिथे शिक्षकांनी या समस्येचा बाऊ न करता बदलत्या परिस्थितीला अनुसरून नवनवीन अध्यापन पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात सातत्य राखलेले दिसून येते

**एक शिक्षकी शाळेत शालेय नेतृत्वाला निभवाव्या लागणाऱ्या भूमिका :**

साधारणतः एक शिक्षकी शाळेतील शिक्षकाला शाळेमध्ये वर्ग शिक्षक या भूमिकेसोबतच इतरही अनेक भूमिका निभवाव्या लागतात.




**एक शिक्षकी शाळेतील शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने :**

**एक शिक्षकी शाळेतील शिक्षकांना –**

- शाळापूर्व तयारी करणे.
- बहुस्तरीय वर्गाध्यापन करावे लागते.
- मुख्याध्यापक, व्यवस्थापक, पालक संपर्क प्रतिनिधी, विविध समित्यांचे प्रमुख इ. चे प्रमुख म्हणून काम पाहावे लागते.
- जिल्हास्तर, तालुका स्तर, केंद्र स्तर विविध सभांना उपस्थित राहावे लागते.
- जिल्हास्तर, तालुका स्तर, केंद्र स्तरावरून मागविलेली विविध प्रकारची माहिती तयार करावी लागते.
- विविध स्पर्धा परीक्षेंची उदा. शिष्यवृत्ती परीक्षा,नवोदय परीक्षा इ. तयारी करावी लागते.
- विविध प्रशिक्षणापासून अशा शाळेतील शिक्षक वंचित राहतात.
- विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देण्यास शिक्षकांना अडचणी निर्माण होतात.
- सर्व प्रकारच्या उपक्रमाचे व कार्यक्रमाचे नियोजन त्याच शिक्षकाला करावे लागते.

- शालेय स्तरावरील विविध बैठकांचे आयोजन उदा. शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ इ.
- शालेय पोषण आहाराची व्यवस्था पाहणे.
- अध्ययन स्तरानुसार कृतिकार्यक्रम तयार करणे.
- पालकांचे विविध विषयांवर उदबोधन करणे.
- विविध उपक्रमाची आखणी करणे.
- विविध सामाजिक संस्थांच्या संपर्कात राहणे.
- लोकसहभाग मिळविण्यासाठी प्रयत्न करणे.
- मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके यांचे वितरण
- विविध प्रकारची सर्वेक्षणे (शाळाबाह्य विद्यार्थी, मतदान प्रक्रिया)इ.

अशा सर्व जबाबदाऱ्या सांभाळून आपली शाळा गुणवत्तेच्या दृष्टीकोनातून परिपूर्ण करण्यासाठी अनेक शिक्षक व मुख्याध्यापक सहयोगी अध्ययन पद्धतीचा वापर करून उपरोक्त सर्व आव्हानांवर मात करण्यात यशस्वी होतात.

**सहयोगी अध्ययन संकल्पना :**


सहयोगी अध्ययनामध्ये एकमेकांच्या मदतीने शिकणे अपेक्षित असते. यामध्ये अध्ययनासाठी आवश्यक असणाऱ्या उच्च क्षमताअसणारे विद्यार्थी तसेच, अध्ययनाची गती मध्यम व कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश असतो. दोन किंवा दोन पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा गट करून एकमेकांकडून शिकण्यासाठी एकत्र काम करण्याची व सहयोग करण्याची संधी देणाऱ्या कृतींची रचना शिक्षकांनी करणे अपेक्षित आहे.

वायगोस्टकीच्या सामाजिक विकास सिद्धांतानुसार मुलांचा बोधात्मक विकास (Cognitive Development) आणि त्याच्या शिकण्याच्या क्षमतेचा विकास हा सामाजिक आंतरक्रियेद्वारा, परस्पर संवादद्वारा साध्य केला जाऊ शकतो. हा विकास मूल ज्या सामाजिक व सांस्कृतिक वातावरणात वाढते त्यावर अवलंबून असतो. सामाजिक आंतरक्रियेची बोधात्मक विकासामध्ये महत्वाची व मुलभूत भूमिका आहे.

**समीप विकास क्षेत्र : Zone of proximal Development**


समीप विकास क्षेत्र म्हणजे व्यक्तीद्वारे वैयक्तिकरीत्या समस्या सोडविण्यासाठी निर्धारित केलेली विकास पातळी व प्रौढांच्या किंवा अधिक सक्षम समवयस्कांच्या सहकार्याने समस्या सोडविण्यासाठी निर्धारित केलेल्या संभाव्य विकास पातळीतील फरक.

वायगोटस्की म्हणतो, मुलांचे शिकणे हे कुशल व्यक्तीद्वारा सामाजिक संवादाद्वारे होते. मग ती व्यक्ती शिक्षक, समवयस्क, वयाने मोठे मूल असू शकते.




**लर्निंग पिरॅमिड : (शिकण्याचा शंकू/धारणेचा शंकू) :**

१९४० मध्ये एडगर डेल या शास्त्रज्ञाने त्याच्या 'ऑडीओ व्हिज्युअल मेथड्स ऑफ लर्निंग' या पुस्तकातून ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. ज्याला त्याने नाव दिले 'अनुभवाचा शंकू'. नॅशनल ट्रेनिंग लॅबोरेटरी या संस्थेने ही संकल्पना विकसित केली आणि याला नाव दिले 'लर्निंग पिरॅमिड'.




हा विविध अध्यापन पद्धतींचा एक समूह असून विविध प्रकारच्या अध्यापन पद्धतीमधून विषयाचे आकलन/ धारणा किती होते  हे टक्केवारीच्या स्वरुपात दाखविते.

लर्निंग पिरॅमिड हे एक सैद्धांतिक शैक्षणिक मॉडेल आहे. ज्यामध्ये असे सांगितले जाते की, मजकूर वाचणे किंवा ऐकणे या पद्धतींपेक्षा सक्रिय सहभागातून शिकणे हे अधिक प्रभावी आहे.

बहुतेक विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकामध्ये वाचलेल्या गोष्टींपैकी १०% टक्के गोष्टीच आठवतात. परंतु जे विद्यार्थी इतरांना शिकवून स्वतः शिकतात त्यांना ९०% बाबी या लक्षात राहतात किंवा समजतात. एखाद्या विषयावर प्रभुत्व मिळवायचे असेल तर तो विषय इतरांना शिकवणे हे महत्वाचे आहे. जे विद्यार्थी एखादा विषय इतरांना अचूकपणे योग्यरीत्या शिकवू शकत असतील, तर त्या विद्यार्थ्यांना ती संकल्पना पूर्णपणे स्पष्ट झालेली असते आणि त्यातील ९०% बाबी तो टिकवून ठेवू शकतो. यासाठी सहयोगी अध्यापन पद्धतीचा वापर करता येतो कारण गटातील प्रत्येक सदस्याला एकमेकांच्या साह्याने शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली जाऊ शकते.

**सहयोगी अध्ययनाचे विद्यार्थ्यांना फायदे :**

- सहकार्याने शिकणे विद्यार्थ्यांना मदत करते.
- विद्यार्थ्यांना एकमेकांकडून शिकण्यासाठी एकत्र काम करण्याची व सहयोग करण्याची सवय लागते.
- विद्यार्थी एकमेकांच्या मतांचा आदर करायला शिकतात.
- विद्यार्थी स्वत:च्या गतीने शिकतात.
- विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होत नाही.
- कमी गती असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकण्यास मदत होते.
- विद्यार्थ्यांमध्ये उच्चस्तरीय कौशल्ये विकसित होतात.
- विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.
- विद्यार्थ्यांच्या मौखिक संभाषणाचा विकास होतो.
- विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व करण्याची क्षमता विकसित होते.
- विद्यार्थ्यांना स्व-व्यवस्थापनाची सवय लागते.
- विद्यार्थ्यांमधील अनावश्यक स्पर्धा कमी होते. त्यामुळे त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राहते.
- विद्यार्थ्यांवरचा अतिरिक्त ताण कमी होतो.ज्यामुळे भीती, चिंता याला स्थानच राहत नाही.

**सहयोगी अध्ययनाचे शिक्षकांना फायदे :**

- शिक्षकांवरील अध्यापनाचा ताण कमी होतो.
- वर्गातील वातावरण आनंदी राहते.
- विद्यार्थी त्यांच्या गतीनुसार शिकतात.
- विद्यार्थ्यांना स्व - व्यवस्थापनाची सवय लागल्यामुळे वर्गात शिस्तीचे वातावरण राहते.
- शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये सुसंवाद कायम राहतो.
- शिक्षकांना प्रशासकीय कामासाठी वेळ देता येतो.
- अनेक जबाबदाऱ्या असूनही अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होतो.
- विद्यार्थी एकमेकांच्या मतांचा आदर करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये भांडण होत नाहीत.

वर्धा जिल्ह्यात ‘शिक्षकपर्व’ व  मा. जिल्ह्याधिकारी यांच्या प्रेरणेतून ‘कार्यप्रेरणा शिबीर’ हे कार्यक्रम घेण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रत्येक तालुक्यातील शाळांमधील उपक्रमशील शिक्षकांचे सादरीकरण ठेवण्यात आले होते. त्यावेळी वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लिंगापूर येथील शिक्षक श्री निलेश इंगळे यांनी सहयोगी अध्यापन पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांच्या इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती साध्य करण्यासाठी पुरेपूर वापर केल्याचे दिसून आले.

नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करून आपल्या शाळेतील इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती प्राप्त करून देण्यासाठी एक शिक्षक शाळेत  सतत कार्यरत असतात. याचा प्रत्यय कार्यप्रेरणा शिबिराच्या आयोजनातून आला.







**यशोगाथा १**

**श्री निलेश इंगळे**

**सहायक शिक्षक, मुख्याध्यापक**

**जि.प. प्राथमिक शाळा, लिंगापूर**

**ता. आष्टी, जि. वर्धा**

वर्धा जिल्ह्यातील पं.स.आष्टी अंतर्गत येणारी लिंगापूर ही जिल्हा परिषदेची एक लहानशी शाळा. मुळात लिंगापूर हे गाव अगदी लहानसे. जेमतेम २०० ते २२५ लोकसंख्या असलेले गाव. गावात उपलब्ध असणाऱ्या सोयी सुविधा नाममात्र. गावात फक्त इयत्ता १ते ५ ची जिल्हा परिषदेची एकच शाळा. शाळेचा एकूण पट १५ असून पटनोंदणी १००% आहे.

गावातील ९०% लोकं मजुरी करुन आपले पोट भरतात. अजुनपर्यंत गावात बस पोहचलेली नाही. अशा लिंगापूर या ठिकाणी श्री. निलेश इंगळे यांची बदली सन २०१८ मध्ये झाली. तेव्हा त्यांच्यासोबत एक शिक्षक सोबतीला होते. येथून त्यांचा या शाळेतील शिक्षणाचा प्रवास सुरु झाला. सद्यस्थितीत श्री निलेश इंगळे एकमेव शिक्षक कार्यरत असून शिक्षणकार्य मात्र प्रभावीपणे सुरू आहे.

गावातील विविध चालीरीती, मुलांच्या सवयी समजून घेत घेत शैक्षणिक बाबी आणि गुणवत्ता विकास यासाठी श्री इंगळे सरांची धडपड चालू असताना कोरोना या आजाराने डोके वर काढले आणि अचानक मुलांच्या शिकण्याच्या प्रगतीला एक नविनच अडसर निर्माण झाला. अशा वेळी डिजिटल साधनांचा वापर करून मुलाचा अभ्यास घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

पुन्हा जेव्हा प्रत्यक्षरीतीने शिक्षण प्रक्रिया सुरु झाली परंतू सरांना त्यानंतर अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. सन २०२० मध्ये सहकारी शिक्षक सेवानिवृत्त झाले आणि शाळेची संपूर्ण जबाबदारी त्यांचा एकट्यावर आली. घरी मुलांना पालकांचे कोणतेही मार्गदर्शन नसताना इयत्ता १ ते ५ चे वर्ग कसे चालवायचे? असा मोठा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला. यासोबतच शालेय प्रशासन, शाळा व्यवस्थापन सदस्यांच्या बैठका, पालक सभा, प्रशासकीय बाबी, ऑनलाइन कामे ,विविध शिष्यवृत्त्या ही सर्व कामे सांभाळून इयत्ता १ ली ते ५ वीला वर्गाध्यापन करणे ही खूप मोठी जबाबदारी त्यांच्यावर आली.

सुरुवातीला अगदी सर्व कामांचा गोंधळ उडाला. हे सर्व चालवायचे कसे असा यक्ष प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहीला.

एक शिक्षकी शाळेत शालेय नेतृत्व म्हणून भूमिका बजावत असताना अनेक गोष्टी प्रकर्षाने समोर येतात. त्यामध्ये मुख्याध्यापक, वर्गशिक्षक, ग्रंथपाल, पालक संपर्क प्रमुख ,परीक्षा प्रमुख, मूल्यमापन अधिकारी, शालेय कार्यक्रम समन्वयक, शाळा व्यवस्थापन समितीचा सचिव, शालेय पोषण आहार प्रमुख आदी भूमिका निभावून शिक्षकांना वर्गाध्यापन करावे लागते. श्री इंगळे सरांना प्रकर्षाने गरज जाणवली ती सर्व गोष्टीचे यथासांग नियोजन करण्याची.

शाळेत शिकणारी मुले आपल्याकडे आशाळभूत नजरेने पाहत असताना योग्य नियोजन व विविध तंत्राचा वापर करुन अध्ययन स्तर कसा वाढवता येईल याचे विचारचक्र सरांच्या डोक्यात सुरु झाले. त्यासाठी डिजिटल साधनांचा वापर करुन मुलाना स्वयं अध्ययनाची सवय लावली व मुलांचे शिकणे सोपे केले.

श्री इंगळे सर हे शाळेत एकच शिक्षक कार्यरत असल्यामुळे प्रत्येक वर्गात जाऊन शिकवणे त्यांना शक्य होत नव्हते. म्हणून वर्गाध्यापनात सहयोगी अध्ययन या पद्धतीचा वापर करण्याचे त्यांनी निश्चित केले. त्यासाठी अध्ययन स्तरानुसार मुलांचे गट तयार करुन मुलांना गटामध्ये कृती करण्यास दिल्या. विद्यार्थी शैक्षणिक साहित्याचा वापर करून, गटामध्ये चर्चा करुन एकमेकांच्या मदतीने ते काम पूर्ण करू लागली. श्री इंगळे सर जेव्हा विद्यार्थ्यांना गरज असेल तेव्हा मदत करत असत. या पद्धतीमुळे त्यांना कमी वेळात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना विविध कृतींमध्ये गुंतवून ठेवणे शक्य होत असे व त्याबरोबरच त्यांचा अभ्यासही पूर्ण होते. विद्यार्थी स्वत:च्या गतीने व सहकाऱ्याच्या मदतीने शिकत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यामुळे मुलांची शिकण्याची भिती कमी होत गेली आणि त्यांची शिकण्याची गती वाढल्याचे त्यांच्या लक्षात आले.

त्यांनी गावातील सुशिक्षित, तरुण वर्गाचे मार्गदर्शन करुन त्यांचा उपयोग 'शिक्षणमित्र' म्हणून करुन घेतला. रिकाम्या वेळात 'शिक्षणमित्र' शाळेतील मुलांचा अभ्यास शाळेत आणि घरी सुद्धा घेतात. त्यामुळे मुलांचा चांगला सराव होण्यास मदत झाली. याशिवाय शाळेत राबविले जाणारे विविध उपक्रम उदा.बाहुली नाट्य, शैक्षणिक साहित्य निर्मिती, विविध स्पर्धा, परसबाग निर्मिती, विजयी झेंडा इ. मुळे मुलांची शिकण्याची गती वाढली. मुलांचा आत्मविश्वास वाढून एकमेकांच्या सहकार्याने आणि मदतीने सुद्धा शिकता येते ही जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण झाली. याचा परिणाम म्हणून शाळेतील प्रत्येक मूल निश्चीत अध्ययन स्तर प्राप्त करण्यात यशस्वी ठरत आहे. उत्तम, आत्मविश्वास असणारे, गुणवत्तापूर्ण विद्यार्थी तयार करण्यास या पद्धतीमुळे हातभार लागला आहे.


कामाचे उत्तम नियोजन, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास यामुळे निर्माण झालेल्या अडचणींवर मात करत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लिंगापूर आज मुलांना चांगल्या प्रकारचे दर्जेदार शिक्षण देण्यास तयार असून गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धतीत चांगले काम करत भावी पिढी सक्षम आणि आत्मनिर्भर कशी बनवता येईल, या गोष्टीसाठी इंगळे सर सातत्याने यशस्वी काम करत असताना दिसत आहेत.

श्री इंगळे सर प्रत्येक गोष्टीचा स्वतंत्र अभ्यास करतात व त्याचा आपल्या मुलांच्या अभ्यासात कसा उपयोग करता येईल याचा प्रयत्न करतात. याचे उदाहरण म्हणजे BALA (Building as a Learning Aid) उपक्रम. हा उपक्रम शाळेसाठी शैक्षणिक उपक्रमाची पर्वणी

ठरला आहे. शाळेची इमारत ही अभ्यास करण्याचे साधन बनले आहे. मुलांचा अभ्यास पूर्ण करण्यात शालेय इमारतीचा सुद्धा यामधे उपयोग करुन घेण्यात येतो.

बाला उपक्रमांतर्गत शाळेमध्ये विद्यार्थ्यांना गटामध्ये काम करता येईल अशा कृतींचे रेखाटन करण्यात आले आहे. ज्यामुळे विद्यार्थी एकमेकांशी चर्चा करून या कृतींमध्ये सक्रिय सहभाग घेतात.

सहकार्यात्मक अध्ययन ,सहयोगी अध्ययन यांसारख्या अध्यापन पद्धतीचा वापर करुन विद्यार्थ्यांची अध्ययन निश्चिती करुन, स्तरनिहाय गट करुन शिक्षक तयारी करुन घेतात.



जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वर्धा व शिक्षण विभाग जि.प. वर्धा
अध्ययन स्तर निश्चिती प्रपत्र - सन 2022-23
शाळा स्तर ( विषय - गणित)

शाळेचे नाव:- प्रा. शा. लिंगापूर
इयत्ता:- 1 ते 5
केंद्राचे नाव:- [illegible] आर्वी
तालुका:- आर्वी
मुख्याध्यापकाचे नाव:- श्री. निलेश प्र. इंगळे
दिनांक:- 28/2/2023

| अ. क्र. | इयत्ता | इयत्तानिहाय पटसंख्या | इयत्तानिहाय स्तर निश्चिती केलेली एकूण विद्यार्थी संख्या | प्रारंभिक | अंक ओळख (1 ते 9) | संख्या ज्ञान (इयत्तानिहाय 2 अंकी व त्यापुढील) | बेरीज | वजाबाकी | गुणाकार | भागाकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पहिली | 2 | | | | 2 | 2 | | | |
| 2 | दुसरी | 5 | | | | | | 5 | | |
| 3 | तिसरी | 2 | | | | | | | 2 | |
| 4 | चवथी | 3 | | | | | | | | 3 |
| 5 | पाचवी | 3 | | | | | | | | 3 |
| 6 | सहावी | | | | | | | | | |
| 7 | सातवी | | | | | | | | | |
| 8 | आठवी | | | | | | | | | |
| | एकूण संख्या | | | | | | 2 | 5 | 2 | 6 |

पडताळणी करणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी
वर्गशिक्षक स्वाक्षरी
मुख्याध्यापक स्वाक्षरी
मुख्याध्यापक जि.प.प्राथमिक शाळा, लिंगापूर पं.स.आर्वी,जि.प.वर्धा

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लिंगापूर या शाळेतील विद्यार्थ्यांचा फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील अध्ययन स्तर

उपरोक्त दोन्ही पद्धतीचा उपयोग दैनंदिन केला जात असल्यामुळे मुलांची शिकण्याची गती वाढली.कृती आणि प्रात्यक्षिक यांचा भरपूर वापर केल्यामुळे मुलांना आनंद मिळतो. प्रत्येकाला समान संधी मिळल्यामुळे प्रत्येक मुलाचा स्तर वाढण्यास मदत झाली. आज श्री इंगळे सरांच्या शाळेतील मुले आत्मविश्वासपूर्वक बोलू शकतात, आपली मते मांडू शकतात. एकमेकांसोबत सहकार्याने काम करतात, एकमेकांच्या मदतीने शिकल्यामुळे ते इतरांचा आदर तर करतातच, परंतु एकमेकांच्या मतांचा आदर करताना दिसून येतात.








सहयोगी अध्यापन पद्धतीचा वापर करून एकमेकांच्या मदतीने विविध संकल्पना शिकताना शाळेतील विद्यार्थी

वर्धा जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद शाळांसाठी प्रधानमंत्री पोषणशक्ती अभियान अंतर्गत परसबाग स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, लिंगापूर या शाळेत सहभाग घेतला होता. शाळेतील विद्यार्थ्यांनी फुलविलेल्या परसबागेस द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला.



प्रधानमंत्री पोषणशक्ती अभियान अंतर्गत शाळेत विद्यार्थ्यांनी तयार केलेली परसबाग



नवराष्ट्र

## जिप प्राथमिक शाळेतील परसबाग ठरली शेतकऱ्यासाठी आदर्श

लिंगापूर येथील उपक्रम

सुनील साबळे । नवराष्ट्र
लहान (आर्वी). आष्टी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या लहान आर्वी ग्रामपंचायत कक्षेतील लिंगापूर येथील जि.प.प्राथमिक शाळेत आधुनिक पद्धतीने लोकसहभागातून तयार करण्यात आलेली 'परसबाग' परिसरातील शेतकर्यांसाठी आदर्श ठरली आहे.
लिंगापूर येथील शाळेत लोक सहभागातुन 'प्रधानमंत्री पोषण शक्ती अभियान' अंतर्गत उत्कृष्ट अशी परसबाग तयार करण्यात आली. परिसरातील अनेक शेतकरी शाळेत जाऊन परसबागेची पाहणी करत आहे. जि. प. शिक्षण विभागाने जिल्ह्यात राबविलेल्या ?प्रधानमंत्री पोषण शक्ती अभियान स्पर्धेत? लिंगापूर शाळेतील ?परसबागेने? द्वितीय क्रमांक पटकावीला आहे.
सदर परसबागेत भेंडी, कांदा, फुलकोबी, मेथी, मुळा, गवार, बरबटी, गाजर ,टमाटर ,वांगी ,लसुण अशी पंधरा प्रकारची विविध वाण आपल्याला पहायला मिळत आहे. कमी पाण्याचा वापर करुन कमी जागेत जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल, असे नियोजन या ठिकाणी परीसरातील शेतक-यांना पाहायला मिळत आहे. या शाळेची ?परसबाग? वर्धा जिल्ह्यातुन द्वितीय क्रमांकावर आल्याने परीसरातील शेतकरी भाजीपाला लागवड पद्धत कसी असावी? पाहण्यासाठी शाळेत येत असल्याचे दिसत आहे. अनेक शेतकरी वर्गाने यापासून भाजीपाला लागवडीचे तंत्र अवलंबिल्याचे सांगितले जात आहे.
शाळेच्या या कार्याबद्दल गटशिक्षणाधिकारी प्रमोद देशपांडे, केंद्रप्रमुख गजानन पुरी, प्रवीण पाटिल, बालविकास अधिकारी मिना टेकरवाडे, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा हर्षा पांडे, उपाध्यक्ष उमेश गोडबोले, सदस्य प्रफुल्ल निंभोरकर, सतीश कुथे, माजी अध्यक्षा शुभांगी कुथे, सोसायटीचे उपाध्यक्ष साहेबराव निंभोरकर, माजी सरपंच सुनिल साबळे या सर्वांनी शाळेचे मुख्याध्यापक निलेश इंगळे यांचे कौतुक केले आहे.

Wardha Plus Edition
21 February 2023 Page No. 4
epaper.navarashtra.com



प्रधानमंत्री पोषणशक्ती अभियान अंतर्गत शाळेत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या परसबागेची वर्तमानपत्राने घेतलेली दखल

**चिंतनात्मक प्रश्न :**

१) इयत्ता १ ते ५ च्या वर्गाला अध्यापन करताना निलेश इंगळे सरांसमोर असलेल्या आव्हानांची यादी करा.

२) या आव्हानांचा सामना करण्यासाठी निलेश इंगळे सरांनी काय नियोजन केले.

३) निलेश इंगळे सरांनी सहयोगी अध्यापन पद्धतीचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोणते बदल दिसून आले.

४) इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंतचे वर्ग असणाऱ्या शाळेत तुमची शिक्षक म्हणून नियुक्ती झाली व तुम्ही तिथे एकटेच शिक्षक आहात तर तुम्ही काय कराल?

### यशोगाथा २

**श्री उल्हास श्रीराम बोचरे**
**सहशिक्षक/मुख्याध्यापक**
**जि.प. प्रा. शाळा सोनेगाव (मुस्तफा)**
**ता. कारंजा (घा) , जि. वर्धा**

जून २०१८ ला नारा केंद्र शाळेतून श्री बोचरे सरांची प्रशासकीय बदली सोनेगाव मुस्तफा या गावी झाली तेव्हा त्या शाळेमध्ये नऊ विद्यार्थी होते.

आंतरजिल्हा बदली होऊन आलेल्या तुमडाम मॅडम त्यावेळी त्यांच्यासोबत होत्या. त्यांची बदली २०२० मध्ये झाली त्यानंतर कोरोना प्रादुर्भाव परिस्थिती चालू असतानाच श्री गावंडे सर हे चार महिन्यांसाठी त्यांचे सहकारी होते त्यांची सुद्धा विशेष बदली झाल्याने २०२० पासून श्री बोचरे सर एकटेच या शाळेमध्ये कार्यरत आहे.

आज रोजी त्यांच्या शाळेतील एकूण पटसंख्या २१ आहे. गावकऱ्यांचा त्यांच्यावरचा विश्वास त्यांच्या कामाबद्दलची आस्था यामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून सहा विद्यार्थी या जिल्हा परिषद शाळेत दाखल झाले आहेत. मध्यंतरी पंधरा ते वीस दिवसांसाठी प्रतिनियुक्तीवर चिंचोली शाळेतील सौ काशीवार मॅडमची नियुक्ती त्यांच्या शाळेत करण्यात आली परंतु त्यांच्या शाळेतील शिक्षकाची बदली झाल्याने त्यांना परत जावे लागले.

त्यामुळे आपल्याला तारेवरची कसरत करावीच लागणार हे जेव्हा सरांना समजले. तेव्हा अनेक समस्या,अनेक आव्हाने त्यांच्या समोर उभी असतानाही त्यामधून सकारात्मक मार्ग काढून विद्यार्थ्यांचे कुठेही नुकसान होऊ नये याची पुरेपूर काळजी घेतली.

श्री बोचरे सरांकडे पाच वर्ग असून आता २०२२-२३ मध्ये इयत्ता पहिलीमध्ये ०५ इयत्ता दुसरीमध्ये ०४ इयता तिसरीमध्ये ०६ इयत्ता चौथीमध्ये ०३ व इयत्ता पाचवीमध्ये ०३ असे एकूण २१ विद्याथी त्यांच्या शाळेत आहेत. श्री बोचरे सरांवर एकट्यावर या विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी पडलेली आहे. बऱ्याच वेळा एकावेळी दोन वर्ग सांभाळण्याचा अनुभव सरांच्या पाठीशी होता परंतु पाच वर्गाला शिकवण्यासाठी आता काय? याचा विचार करत असतानाच बहुवर्ग अध्यापन अंतर्गत सहयोगी अध्यापन पद्धतीचा वापर सर अध्ययन अध्यापनासाठी करू लागले. प्रत्येक वर्गातील अध्ययन स्तर चांगला असणाऱ्या विद्यार्थ्याला कमी वेगाने अध्ययन करणाऱ्या इतर मुलांना सोबत घेऊन शिकण्यास श्री बोचरे सरांनी सुविधा निर्माण केली. विद्यार्थी स्वत: एकमेकांना सोबत घेऊन शिकतात. ते चर्चा करतात, शैक्षणिक साहित्य वापरतात, अडचण आली तर एकमेकांची मदत घेतात, एक सकारात्मक आंतरक्रियेद्वारे ते गटामध्ये शिकतात.

बैठक व्यवस्थेमध्ये अध्ययन स्तरानुसार विद्यार्थ्यांचे गट करून श्री बोचरे सर संनियंत्रण करतात. विद्यार्थ्यांचे वर्गानुसार व्हाट्सॲप ग्रुप केलेले आहेत. त्यानुसार पाठवलेला अभ्यास विद्यार्थी दाखवतात होमवर्कच्या ऐवजी होम प्ले असा शब्द वापरून गृहपाठ आनंददायी केल्यामुळे मुलांवरील गृहपाठाचा ताण कमी होऊन गृहपाठाचा आनंद त्यांच्यात निर्माण झाला आहे. हसत खेळत शिक्षण हा श्री बोचरे सरांच्या अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील आत्मा आहे.

अध्ययन स्तरानुसार अध्यस्तर वाढवण्यासाठीचे पूरक साहित्य खूप उपयोगाचे आहे असे सरांना वाटते. त्यामुळे गणित पेटी, विज्ञान पेटी, मराठी शब्द पट्ट्या, वाक्य पट्ट्या, इंग्रजी भाषेच्या विकासासाठी असलेली पेटी, शब्दांचे काड्र्स ,काही सरांनी स्वत: तयार केलेले शैक्षणिक साहित्य इत्यादीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मूलभूत अध्ययन क्षमता विकसित होण्यास खूप मदत झाली. म्हणूनच विद्यार्थी गटामध्ये सहयोगी अध्यापन पद्धतीचा वापर करू शिकत असताना या साहित्याचा वापर जरूर करतात. ज्यामुळे त्यांच्या शिकण्याची गती वाढली आहे.

यावर्षी लागलेल्या २०२२ च्या निकालामध्ये **पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा** वर्ग पाचवीचे या शाळेतील दोन विद्यार्थी बसले होते ते दोन्ही शिष्यवृत्तीस पात्र झालेले आहेत.

हे सर्व करत असताना श्री बोचरे सर मुख्याध्यापकाची भूमिका सुद्धा जबाबदारीने निभावतात. दररोज मागितली जाणारी विविध प्रकारची माहिती, विविध शालेय अभिलेखे, फाईलस्, शालेय पोषण आहार, सर्व ऑनलाईन लिंक्स, प्रशिक्षणे, बैठका, शिक्षक कृती गट समन्वयक म्हणून भूमिका, सोबतच शालेय परसबाग, टुर्नामेंट, विज्ञान प्रदर्शन सहभाग, ही सर्व कामे अचूक पद्धतीने आणि काटेकोरपणे श्री बोचरे सर करतात. सहयोगी अध्यापन पद्धतीच्या वापरामुळे ही कामे तर सर करतातच सोबत विद्यार्थी सुद्धा अभ्यासात मागे न राहता एकमेकांच्या मदतीने शिकतात. यामुळे विद्यार्थ्यांना एकमेकांसोबत काम करण्याची जबाबदारी घेण्याची सवय लागलेली दिसून येते. त्यामुळे सकाळी जेव्हा शाळा सुरू होते तेव्हा विद्यार्थी स्वतःच परिपाठ घेतात मुलांचे आठवड्यातील वारानुसार गट केले आहेत. त्यानुसार ते परिपाठ घेतात त्यामध्ये स्वत: सामान्य ज्ञानाचे प्रश्न काढून ते सादर करतात.

वर्गाध्यापनासोबतच शाळेतील भौतिक सुविधेसाठी लोकसहभाग व जून २०२२ मध्ये जिल्हा परिषद विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्ताव तयार करून सरांनी शाळेचे पाच लाखाचे दुरुस्तीचे काम केले आहे.





सहयोगी अध्यापन पद्धतीचा वापर करून एकमेकांच्या मदतीने विविध संकल्पना योगासनांचा सराव करताना शाळेतील विद्यार्थी

**सहयोगी अध्ययन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल :**

१) विद्यार्थ्यांचा अध्ययन अध्यापनातला सहभाग वाढला आहे.

२) विद्यार्थी आनंदाने अध्ययन अध्यापनात सहभागी होतात.

३) अध्ययन अध्यापनात ते एकमेकांचे विचार व कौशल्यांची देवाणघेवाण करतात.

४) एखादी शंका असेल तर विद्यार्थी शिक्षकांकडे जाण्यापूर्वी आपल्या सहाध्यायाशी चर्चा करतात.

५) सहभागी अध्ययनामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती नियमित असते.

६) विद्यार्थ्यांमध्ये शाळेत परस्पर आंतरक्रिया,शिक्षक आंतरक्रिया चांगली होताना दिसत आहे.

७) अध्ययनपूरक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आहे.

८) विद्यार्थी चर्चेद्वारे समस्या सोडविताना, त्यांच्या कल्पना मांडताना दिसत आहेत.

९) कोरोना काळात विद्यार्थ्यांचे जो अध्ययन ऱ्हास झाला त्यानंतर आता विद्यार्थ्यांच्या संपादणूकीत वाढ झालेली दिसून येत आहे.

१०) विद्यार्थी प्रत्येक बाबीकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहताना दिसतात.

११) सांघिक जबाबदारी स्वीकारतात.

१२) विद्यार्थी स्व- व्यवस्थापन तर करतातच परंतु शाळेच्या व्यवस्थापनात ही सहभागी होतात.

**विचार करूया चर्चा करूया –**

- तुमच्या शाळेत तुम्ही एकच शिक्षक आहात आणि तुमच्याकडे दोन पेक्षा जास्त वर्गाला अध्यापन करण्याची जबाबदारी आहे.  त्याचबरोबर शाळा प्रमुख म्हणून येणारी जबाबदारी आहे. अशा परिस्थितीमध्ये एकूण पाच  वर्गांना अध्यापन व शाळा प्रमुख ही जबाबदारी पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक म्हणून तुम्ही काय कराल?
- तुमच्या शाळेमध्ये इयत्ता चौथी व पाचवीचे काही विद्यार्थी अभ्यासात चांगले आहेत तर मुख्याध्यापक म्हणून तुम्ही या विद्यार्थ्यांची  अध्ययन अध्यापनासाठी कशी मदत घ्याल.
- तुम्ही जिल्हा परिषदेच्या इयत्ता १ ते ५ च्या शाळेत शिक्षक म्हणून नियुक्त आहात. जिल्हा स्तरावर महत्वाच्या विषयाच्या अनुषंगाने एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. तिथे उपस्थित राहणे आपणास अनिवार्य आहे. आपण शाळेतील सर्व वर्गांचे त्या दिवसाचे नियोजन कसे कराल.

**मोड्युलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून उपयुक्तता:**

- आजच्या परिस्थितीमध्ये विविध कारणास्तव जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना एकापेक्षा जास्त वर्गांना अध्यापन करणे क्रमप्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये शिक्षकांसाठी सहयोगी अध्ययन पद्धतीचा प्रभावी वापर परिणामकारक ठरतो.
- विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण होण्यास मदत होते.
- विद्यार्थी एकमेकांच्या मताचा आदर करण्यास शिकतात.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये निर्देशित केल्यानुसार विद्यार्थ्यांमध्ये २१ शतकातील कौशल्यांचा  विकास साधला जातो.
- समवयस्कातील अभ्यासास प्रोत्साहन मिळते. शिक्षकांच्या देखरेखीखाली ऐच्छिक आणि आनंददायी उपक्रम  म्हणून सहयोगी अध्यापन पद्धती उपयुक्त ठरते.
- सहयोगी अध्यापनावर भर दिला तर विद्यार्थ्यांचे आपापसातील हेवेदावे, वाद कमी होतात.विचारांची देवाणघेवाण चांगली होते  त्यांचा शिक्षणातील सहभाग वाढतो.
- गटाने काम करत असल्यामुळे त्यांच्यात कामाची, जबाबदारीची, उत्तरदायित्वाची देखील विभागणी होते.

**समारोप :**

इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास, प्रशासकीय जबाबदारी इतर कामे व शाळेत एकच शिक्षक अशी प्रतिकूल परिस्थिती असतानाही परिस्थितीला दोष न देता, त्यावर मात करण्याची क्षमता ही शालेय नेतृत्वात असते. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची जबाबदारी घेऊन, त्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी, चांगला नागरिक घडविण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींचा वापर करून, स्वत: त्यासाठी विविध कृतींची रचना करून, विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याचा आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम शिक्षक अगदी निष्ठेने करताना दिसून येतात.

अनेक शाळा अशा आहेत जिथे केवळ एक शिक्षक असून अनेक जबाबदाऱ्या ते एकावेळी पेलत आहेत. अशा शाळांकरिता श्री निलेश इंगळे व श्री उल्हास बोचरे यांच्यासारखे शिक्षक स्वत: सतत कार्यरत राहून शाळेचा व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्नरत आहेत.

**संदर्भ सूची :**


१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

२) सहयोगी अध्ययन – डॉ. ललिता आगाशे

३) शालेय नेतृत्व संकल्पना व नियोजन –निष्ठा

४) शालेय व्यवस्थापन व नेतृत्व क्षमता – डॉ. अरुणा कौलगुड

**सहयोगी अध्यापन पद्धती बद्दल अधिक जाणून घेण्यासाठी उपयुक्त लिंक्स**

५) https://www.indeed.com/career-advice/career-development/learning-pyramid

६) https://www.edtechreview.in/trends-insights/insights/understanding-the-learning-pyramid/

७) http://www.ceebl.manchester.ac.uk/events/archive/aligningcollaborativelearning/Vygotsky.pdf

८) https://www.structural-learning.com/post/the-zone-of-proximal-development-a-teachers-guide

९) https://www.structural-learning.com/post/the-zone-of-proximal-development-a-teachers-guide



| मोड्यूल विकसक | समन्वयन | मार्गदर्शक |
| --- | --- | --- |
| श्रीमती प्रतिभा देशपांडे<br>अधिव्याख्याता<br>जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था<br>वर्धा | डॉ.ज्योती कुलकर्णी<br>समन्वयक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व<br>प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | श्री.रमाकांत काठमोरे<br>संचालक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व<br>प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |